# दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरुड (पुसद) जि. यवतमाळ–445204

जाक.सञ/दु.तं.म./कंत्राटी नियुक्ती/जाहीरात/1624/2017 दि. 04/09/2017

**अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक : दि. 16/09/2017**

**कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात लिपीक नि टंकलेखक पदाच्या भरतीसाठी जाहिरात**

दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरुड (पुसद) येथील कार्यालयीन कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या नेमणूकीसाठी पात्र उमेदवारांकडुन सहयोगी अधिष्ठाता, दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरुड ता.पुसद जि.यवतमाळ यांचे अधीनस्त कार्य करणेसाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत असुन पदाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटी पदाचे नांव | एकत्रित पारिश्रमीक/प्रतिमाह | आरक्षण | पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | लिपीक–नि–टंकलेखक | रु. 12,958/– | सर्वसाधारण | 01 |

**मार्गदर्शक सुचना/अटी :–**

1. निर्धारित तारखेनंतर आलेल्या व अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.
2. महाविद्यालयाने विहीत केलेल्या नमुन्यातच अर्ज स्विकारले जातील. अर्जाची झेरॉक्स प्रत किंवा फॅक्स कॉपी स्विकारली जाणार नाही.
3. अर्जावर उमेदवाराने स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे.
4. अर्ज केलेल्या पदासाठी निर्धारीत केलेली शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव इ. उमेदवाराने दि. 05/09/2017 पर्यंत धारण करणे आवश्यक आहे.
5. अर्ज प्राप्ती नंतर अर्जासंबंधीचे कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्रे/कागदपत्रे स्विकारले जाणार नाहीत.
6. वयोमर्यादा :

   उमेदवारांचे वय दिनांक 05/09/2017 रोजी किमान 18 वर्षे व कमाल 38 वर्षे (खुला प्रवर्गासाठी) असावे. मागासवर्गीयांसाठी 43 वर्षापेक्षा जास्त वय नसावे. अपंग उमेदवार यांचेसाठी 45 वर्षापर्यंत वयाची अट शिथील राहील.
7. जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र उमेदवाराकडुन मोठया प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने विद्यापीठ निर्णयानुसार विहीत अर्हता/गुणवत्तेच्या आधारे पात्र व अनुभवी अशा मर्यादित उमेदवारांनाच आवश्यक वाटल्यास मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. तसेच पात्र उमेदवारांची चाळणी करण्याचे दृष्टीने योग्य ती उपाय योजना अवलंबविण्याचे त्याचप्रमाणे निवड प्रकियेदरम्यान उमेदवाराची प्रत्यक्ष मुलाखत घ्यावयाची किंवा नाही याचे अधिकार सहयोगी अधिष्ठाता, दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय वरुड (पुसद) हे राखून ठेवत आहेत.
8. अर्जदाराने अर्जावर पासपोर्ट साईज (अलिकडील काळातील) रंगीत फोटो लावावा.
9. टपाल खात्याच्या कोणत्याही विलंबास अथवा टपाल गहाळ झाल्यास महाविद्यालय/कार्यालय जबाबदार राहणार नाही व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
10. समीतीने उमेदवाराची निवड केली असली तरी तात्पुरती कंत्राटी नियुक्तीचे आदेश निर्गमीत न करण्याचे अधिकार महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत.
11. महाविद्यालयाने मुलाखतीसाठी बोलाविल्यास उमेदवारांस मुलाखतीकरिता स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
12. तात्पुरती कंत्राटी नियुक्ती पश्चात उमेदवारांने खोटी माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे कधीही आढळून आल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता संबंधीत उमेदवाराची कंत्राटी नियुक्ती रद्द करण्यात येईल.
13. उमेदवारांनी अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे/प्रमाणपत्रे साक्षांकीत करुन जोडणे आवश्यक आहे.
14. फक्त सक्षम अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केलेले प्रमाणपत्रेच स्विकृत केले जातील.
15. अर्जातील प्रत्येक रकाना भरण्यात यावा. माहिती संबंधीत नसल्यास "लागू नाही" किंवा "निरंक" असे नमूद करणे आवश्यक आहे.
16. अर्जदाराला सदर पदाकरीता करावयाचा विहीत नमुन्यातील अर्ज दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय वरुड (पुसद) येथे विकीकरीता उपलब्ध राहील व कार्यालयीन वेळेतच खरेदी करता येईल.
17. अर्जाचे शुल्क मागासवर्गीय प्रवर्गासाठी रु. 200/– अक्षरी रुपये दोनशे व खुल्या प्रवर्गासाठी रु. 300/– अक्षरी रुपये तिनशे फक्त Pay & Accounts officer, College of Dairy Technology, Warud (Pusad)

यांचे SBI Account no. 10940851640 यामध्ये ऑनलाईन अथवा www.cdtpusad.in या संकेतस्थळावर State Bank Collect द्वारे भरणा केल्यानंतरच महाविद्यालयामधुन उमेदवारांना अर्ज प्राप्त करुन घेता येईल.

18. स्वहस्ताक्षरात संपूर्ण भरलेला अर्ज आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत पोहचेल या दृष्टीने डाकेद्वारे किंवा व्यक्तीशः निम्नस्वाक्षरी करण्यान्यास निर्धारित दिनांकास सादर करावा. उशिरा प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.
19. तात्पुरती कंत्राटी निवड झालेल्या उमेदवारांना विद्यापीठाने ठरवून दिलेले बंधपत्र/करारनामा कार्यालयात रुजु होतेवेळी सादर करणे आवश्यक राहील. उमेदवाराने त्यांचे निवडीसाठी कसल्याही प्रकारचे दडपण आणण्याचा प्रयत्न केल्यास/आढळून आल्यास त्याला अपात्र ठरविण्यात येईल
20. सदर नेमणूक ही निव्वळ तात्पुरत्या/कंत्राटी स्वरुपाची असुन उमेदवारांना दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरुड (पुसद) येथे नियुक्त झालेल्या पदासंबधीत व इतर निर्देशित कार्य करावयाची आहेत.
21. **शैक्षणिक अर्हता :–**

    1) **लिपीक नि टंकलेखक**

       1. एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण
       2. मराठी 30 श.प्र.मी. व इंग्रजी 40 श.प्र.मी. वेगाचे टंकलेखनाचे शासनमान्य वाणिज्य मंडळाचे प्रमाणपत्र.

       संगणकाची MS-CIT / DOEACC / CCC परीक्षा उत्तीर्ण

22. सदर नियुक्ती ही निव्वळ अकरा महिन्यांकरीता तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपाची असून नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येईपर्यंत किंवा सदरचे पद विद्यापीठ परिनियमातील निवड प्रक्रियेच्या तरतुदीनुसार भरेपर्यंत यापैकी जो कालावधी कमी असेल त्या कालावधीकरीता राहील.
23.. कोणत्याही परिस्थितीत सदर तात्पुरती नियुक्ती नियमित करता येणार नाही किंवा संबंधीतास त्याबाबत नियमित नियुक्ती करीता कोणताही हक्क सांगता येणार नाही.
24. अर्जदाराने अर्जाच्या बंद लिफाफ्यावर **"लिपीक–नि–टंकलेखक या पदाकरीता अर्ज"** असे स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे.
25. निवड करावयाच्या तात्पुरत्या कंत्राटी पदसंख्येमध्ये वाढ करण्याचा अधिकार सहयोगी अधिष्ठाता, दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरुड (पुसद) हे राखुन ठेवत आहेत.
26. विद्यापीठ मंजूरी पश्चात गुणवत्तेच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारास तात्पुरत्या स्वरुपास कंत्राटी पध्दतीने नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येईल.

महाविद्यालयाने ठरवुन दिलेल्या विहीत नमुन्यातील परिपूर्ण अर्ज **"मा.सहयोगी अधिष्ठाता, दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरुड पो. मोहा ता. पुसद जि. यवतमाळ पिन–445204"** यांचेकडे दि.15/09/2017 रोजी अथवा त्यापुर्वी पोहोचतील असे पाठवावे. ~~दिनांकाला~~

सहयोगी अधिष्ठाता
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय,
वरुड (पुसद) जि.यवतमाळ
5/9/17